|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC ReAccredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

---

जा.क्र.:कबचौउमवि/७-ह/रेकॉर्ड/प.गै./१२६/२०२५ दिनांक:१५/०१/२०२५

**महत्वाचे**

प्रति,

१. मा.प्राचार्य,
कबचौउमवि संलग्नीत सर्व महाविद्यालये,

२. संचालक, कबचौउमवि संलग्नीत सर्व मान्यताप्राप्त संस्था,

३. मा. संचालक / विभागप्रमुख,
कबचौउमविच्या प्रशाळा / शैक्षणिक विभाग,

विषय :-परीक्षा गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कार्यवाही करणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सध्या परीक्षा गैरप्रकारात Micro Xerox कॉपी व पुस्तके, कॉपीचे इतर साहित्य जास्त प्रमाणात आढळून येत असल्याने परीक्षा गैरप्रकार चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदर प्रकरण परीक्षा व मूल्यमापन मंडळापुढे सादर करण्यात आले. त्या अनुषंगाने व परीक्षा मूल्यमापन ठराव क्र. प.मू.मं.४८ व ४९/२०२४, दि.०६ डिसेंबर,२०२४ मधील क मधील ठराव पुढीप्रमाणे 'परीक्षा गैरप्रकारात Micro Xerox कॉपी व पुस्तके, कॉपीचे इतर साहित्य आढळून येत असल्याने परीक्षेतील कॉपीचे प्रमाण रोखण्यासाठी कडक उपाययोजना करून महाविद्यालयांनी अंतर्गत भरारी पथकाकडून महाविद्यालयाच्या प्रवेशव्दाराजवळ तसेच परीक्षा कक्षात कनिष्ठ पर्यवेक्षक व अंतर्गत वरीष्ठ पर्यवेक्षक, अंतर्गत भरारी पथक यांनी विद्यार्थ्यांची काळजीपुर्वक तपासणी करावी असे महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे. तसेच बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक आणि भरारी पथकास सुचना देण्यात याव्यात.'

या अनुषंगाने मा. प्राचार्य, यांनी अंतर्गत भरारी पथकाकडून महाविद्यालयाच्या प्रवेशव्दाराजवळ तसेच परीक्षा कक्षात कनिष्ठ पर्यवेक्षक व अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक, अंतर्गत भरारी पथक यांनी विद्यार्थ्यांची काळजीपुर्वक तपासणी करण्याबाबत सर्व संबंधितांना सुचित करण्यात यावे. परीक्षा केंद्रावर याबाबत योग्य ती खबरदारी घेवून परीक्षा व मूल्यामापन मंडळाच्या ठरावानुसार काटेकोर पणे अंमलबजावणी करावी. ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ